पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे-४११००७.

दूरध्वनी क्र.०२० - २५६०१२०४
इंजि. - २५६०१२१९
मॅनेज/लॉ/शि.शा.- २५६०१२१६
आर्टस - २५६०१२१३
सायन्स-२५६०१२१४/कॉमर्स-२५६०१२१५
फार्मसी/मेडिकल - २५६०१२२०

परीक्षा विभाग
टेलिग्राफ : "युनिपुणे"
फॅक्स - ०२० -२५६०१२०४
फॅक्स - ०२० - २५६०१२०८
वेबसाईट:www.unipune.ernet.in
वेबसाईट:www.unipune.ac.in
ई-मेल : coe@unipune.ernet.in

संदर्भ:— परीक्षा / वाणिज्य / २७९३ दिनांक:— ०४ / ०२ / २०१०

मा.प्राचार्य,
सर्व संलग्न वाणिज्य महाविद्यालये,

**विषय:—** एम.कॉम. ( सत्र पध्दत ) नोव्हेंबर २००९ परीक्षेच्या निकालाबाबत

महोदय / महोदया,

एम.कॉम.( सत्र पध्दत ) नोव्हेंबर २००९ मध्ये घेतलेल्या परीक्षेचा निकाल दिनांक ०८/२/२०१० रोजी दुपारी ३.०० वाजता जाहीर करण्यात येत आहे. परीक्षेचा निकाल खालीलप्रमाणे महाविद्यालयात वितरीत करण्यात येईल.

१. पुणे शहरातील व पुणे जिल्हयातील महाविद्यालयांनी त्यांच्या विद्यार्थ्यांचा निकाल दिनांक ०८/०२/२०१० सकाळी ११.०० ते दुपारी २.०० या वेळेत परीक्षा विभागातून घेऊन जावयाचे आहेत.

२. अहमदनगर व नाशिक जिल्हयातील महाविद्यालयांनी त्यांच्या विद्यार्थ्यांचा निकाल संबंधित विद्यापीठ उपकेंद्रातून दिनांक ०८/०२/२०१० रोजी दुपारी १२.०० ते २.०० या वेळेत घेऊन जावयाचे आहेत.

आपल्या महाविद्यालयामार्फत उपरोक्त परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची गुणपत्रके जाहीर झाल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांना देण्याची व्यवस्था करावी. त्यामुळे विद्यापीठामध्ये निकाल विचारण्यासाठी अथवा इतर चौकशी करण्यासाठी विद्यार्थ्यांना यावे लागणार नाही. त्याचप्रमाणे एखादया विद्यार्थ्याच्या गुणपत्रकामध्ये काही दोष अथवा त्रुटी आढळल्यास, विद्यार्थ्याला परस्पर विद्यापीठात न पाठविता महाविद्यालयाच्या प्रतिनिधी मार्फत अशी प्रकरणे तातडीने विद्यापीठाच्या परीक्षा विभागात एकत्रित आणून द्यावीत. यानंतर त्यातील दुरूस्त्या त्वरीत करून घेण्याबाबत कार्यवाही करता येईल.

आपणांस विनंती करण्यात येते की, उपरोक्त नमूद केल्यानुसार आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या परीक्षेचा निकाल वेळेत घेऊन जाण्याची व वितरण करण्याची व्यवस्था करावी.

कळावे,

आपला विश्वासू,
उपकुलसचिव
(परीक्षा-२)

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी:

१. मा. उपकुलसचिव (परीक्षा १)
२. मा. सर्व सहाय्यक कुलसचिव (परीक्षा)
३. विद्यापीठ उपकेंद्र प्रमुख, नाशिक व अहमदनगर, संबंधित महाविद्यालयांना वेळेवर निकाल देण्याची व्यवस्था करावी.
४. मा. गृहव्यवस्थापक गृहव्यवस्थापन विभाग अहमदनगर, नाशिक जिल्हयासाठी दिनांक ०८/०२/२०१० रोजी सकाळी ठीक ७.०० वाजता दोन स्वतंत्र गाडया उपलब्ध करून देण्यात याव्यात.